# रे. मु. नं. ३९/२०१७ मधील निशाणी क्र. ७५ वर आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्र. वादी नं. ३२ व ३३ यांनी त्यांना लेखी म्हणणे व कैफीयत दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाची माफी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्र. वादींनी अर्जात असे कथन केलेले आहे की, प्र. वादी क्र. ३२ व ३३ यांना लेखी म्हणणे व कैफीयत दाखल करण्यासाठी ६५ दिवसांचा विलंब झालेला आहे. प्र. वादी क्र. ३२ हा गुजरात मध्ये राहतो व प्र. वादी क्र. ३३ हे मुंबई येथे रहातात व दाव्यासंबंधी आवश्यकत ते कागदपत्र प्राप्त करण्यांस कालावधी लागल्यामुळे लेखी म्हणणे व कैफीयत दाखल करण्यासाठी विलंब झालेला आहे. प्र. वादी यांस विलंबाची माफी न मिळाल्यास त्यांचे पैशाने न भरून येणारे नुकसान होईल व नैसर्गिक न्याय तत्वानुसार प्रतिवादी क्र. ३२ व ३३ यांना दाव्यांस म्हणणे व कैफीयत दाखल करण्यासाठी संधी देणे आवश्यक आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यांस त्यांनी विनंती केलेली आहे.

३. वादीने निशाणी क्र. ७८ वर लेखी म्हणणे दाखल करून प्रस्तुत अर्जास अशी हरकत घेतली की, प्र. वादी यांना एकूण १८० दिवसांचा विलंब झालेला आहे व प्र. वादींनी दाव्यांस जाणीव पुर्वक विलंब व्हावा या उद्देशाने लेखी कैफीयत दाखल केलेली नाही व विलंब माफीचे कारण हे संयुक्तीक नसल्यामुळे अर्ज फेटाळण्यांस विनंती केलेली आहे.

४. अर्ज व लेखी म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला.

५. प्र. वादी यांनी दाव्याकामी मुदतीत लेखी म्हणणे व कैफीयत

दाखल केलेली नाही. सबब लेखी म्हणणे व कैफीयत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. लेखी म्हणणे व कैफीयत दाखल करण्यास प्र. वादी नं. ३२ व ३३ यांनी विलंब केला असला तरी प्रस्तुत दाव्याचा न्यायनिर्णय हा गुणदोषावर लावण्यासाठी नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार प्र. वादी क्र. ३२ व ३३ यांनी लेखी म्हणणे व कैफीयत दाखल करण्यांस संधी देणे आवश्यक आहे या निष्कर्षा पर्यत मी पोहचलेलो आहे. वादीस झालेली गैरसोय ही प्र. वादी नं. ३२ व ३३ यांच्यावर प्रस्तुत अर्जाचा खर्च लादून भरपाई केली जावू शकते. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे मला योग्य वाटते. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. ७५ मंजूर करण्यांत येत आहे.

२. प्र. वादी क्र. ३२ व ३३ यांस लेखी म्हणणे व कैफीयत दाखल करण्यासाठी झालेला ६५ दिवसांचा विलंब हा प्र. वादी क्र. ३२ व ३३ यांनी वादीस खर्च म्हणून प्रत्येकी रक्कम रू. ३००/- देण्याच्या अटीवर माफ करण्यांत येत आहे.

३. प्र. वादी क्र. ३२ व ३३ यांनी खर्च म्हणून रक्कम ही पुढील तारखे पर्यत किंवा पुढील तारखेस दयावी. खर्चाची रक्कम पुढील तारेख पर्यत किंवा पुढील तारखेस न दिल्यास प्र. वादी क्र. ३२ व ३३ विरूध्द विना म्हणणे व विना कैफीयत आदेश पारीत करण्यांत येईल.

ठिकाण – महाड
दिनांक – १५/०१/२०१९

(वि. रा. डोईफोडे)
सह दि. न्या. क. स्तर, महाड